**नियमित दिवाणी मुकदमा नं.७९/२०१६ मधील**
**निशाणी ७४ वरील आदेश**
**(CNR NO. MHSI04000427-2016)**
**(भालचंद्र पाडगांवकर वि. शंकर पाडगांवकर व.१३)**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दाखल केलेला असून, त्यांच्या कथनाप्रमाणे सदर कामातील वादी भालचंद्र पाडगांवकर हे मयत झाले असून, त्यांनी दाव्यात दुरुस्ती केल्याप्रमाणे वारसदार आहेत. त्यापैकी वारस नामे रंजना राजेंद्र शेणई व सुजाता जयराम कोठारे यांची वकीलपत्रकावर सही घेणे शक्य होत नाही. सबब, त्यांना प्रतिवादी सदरामध्ये सामील करण्याची त्यांनी विनंती केलेली आहे.

२. सदर अर्जावर प्रतिवादी यांनी आपले म्हणणे दाखल केलेले नाही. त्यामुळे सदरचा अर्ज त्यांच्या म्हणण्याशिवाय चालविणेत आलेला आहे.

३. प्रस्तुत अर्जाचे कामी अर्जात नमुद वारसांना दि.१७.०२.२०२५ रोजीच्या आदेशाने नोटीस पाठविणेत आली आहे. सदर नोटीसीची, सदर वारसदार यांना बजावणी होऊन देखील ते प्रस्तुत दाव्याचे कामी हजर झालेले नाहीत. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज त्यांच्या म्हणण्याशिवाय चालविणेत आलेला आहे.

४. अर्ज व अभिलेखाचे अवलोकन करता असे दिसून येते की, मयत वादी यांचे वारस अभिलेखावर आणलेले असताना, अर्जात नमुद वारसदार हे दाव्याच्याकामी हजर झालेले नाहीत. सबब, त्यांचे दाव्यातील स्वारस्य व हक्क अबाधित होणे आवश्यक आहे, आणि त्यामुळे ते दाव्याचे आवश्यक पक्षकार आहेत. सदरचे वारसदार हे प्रस्तुत दाव्यामध्ये वादी म्हणून हजर झालेले नाहीत. त्यामुळे वादी यांच्या वारसांतर्फे, दाखल प्रस्तुतच्या अर्जाप्रमाणे, अर्जात नमुद

वारसदारांना प्रतिवादी सदरी सामील करणे योग्य व न्यायोचित होईल. करीता मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. वादीतर्फे वारसदार यांना अर्जात नमुद वारसदार रंजना राजेंद्र शेणई व सुजाता जयराम कोठारे यांना प्रतिवादी सदरामध्ये सामील करण्याची परवानगी देण्यात येते.

२. वादी यांनी त्या प्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करणेची असून, दाव्याची दुरुस्त प्रत पुढील तारखेस किंवा त्याआधी अभिलेखावर दाखल करणेचे आहे.

३. सदर वारसदारांना प्रतिवादी सदरामध्ये दाखल केल्यानंतर त्यांना दाव्याचे समन्स पाठविण्यात यावेत, त्याकरीता वादी यांनी दाव्याच्या दुरुस्त प्रती पुढील तारखेपर्यंत पुरविण्याच्या आहेत.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर )

Digitally signed by KUMBHAR RANJANA GOVIND
Date: 2026.02.05 18:15:26 +0530

दिनांकः–०५/०२/२०२६. (आर.जी.कुंभार)

ठिकाणः– कुडाळ अति. सह दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर), कुडाळ.